Date: 20/04/2021

C 02 (2021-22)

To
Whole School Parents

**Reference:** Session updates 21-22.

Dear Parents,

Greetings

Hope you all are safe, healthy and in best of your spirits. All those above 45 would surely have got their first jab by now. It's important for all of us to act as responsible citizens and follow all the protocols diligently. I also welcome the new members of Nursery and other new admissions as well.

As I too complete my one year with the SVM family I take this opportunity to thank each one of you and my very own dearest lively learners. Often decisions are made with the child's best interest to protect families and the teachers that we work as a community, should these have been challenging for you we hope that you realise that our intent is to help the children. At times decisions have to be taken keeping the bigger picture in mind. Hope to receive your affection and cooperation in the years coming by. For me personally whatever I have done and will continue to do in future will be in the interest of every individual learner as the centre of our actions. I am extremely fortunate to work under an Excellent School Management, Valuable partners and a Super Duper Team SVM.

Today on 20th of April we have completed our one month of SVM Intersession English Boot Camp. Hope learners got to learn a bit more than usual and would have enjoyed it as much as our facilitators while delivering it. For teachers the best time is the time spent with their beloved learners. It's always a very special bond.

Thanks for taking out time and giving us feedback, it always helps us to improve further.

So now after the successful completion of a challenging year for all of us we are all set for the new Academic year to begin from June 7th 2021.The school timings and other details will be shared during the Parent Orientation which will be planned tentatively on 24th and 25th of May 2021.

As Learners are now beginning to enjoy their summer break their teachers have curated summer packs which have been created keeping them meaningfully engaged revisiting and practicing important skills and learn while doing hands on activities leading to the skill based outcomes. Do follow all the instructions carefully like maintaining a separate notebook or file folder of their summer assignment which will be collected after the summer break once the school reopens either in soft copy or in the hard copy format.

We are also sharing the list of textbooks, notebooks and stationery material you are requested to procure the same latest by May 30th. Purchase it when its safe for you to move out.

Such are the times and the developments in our country that we must exercise discretion and caution as we approach any strategy and we welcome your support at all times for your understanding whether it's a blended learning format or physical world we are one school and one community and at this time partnership is critical and we believe the home-school partnership will allow us to enjoy learning as seamless.

Once again stay indoors stay safe.

**Kindly note that the school office will be functional online for enquiries, admissions, payment of fees etc. Admission forms are available online for friends and relatives who wish to enrol their children with SVM.

Once permitted by the local government, the school office will be functional physically.

We will be available for your queries and suggestions on our official WhatsApp and Email.

Yours Truly

Monica Jaiswal

Principal

Sarvankash Vidya Mandir

दिनांक २०/०४/२०२१
C ०२ (२०२१-२२)

प्रति,
प्रिय पालकवर्ग,

<u>संदर्भ : नवीन शैक्षणिक वर्ष- २०२१-२२</u>

सप्रेम नमस्कार !
आपण सर्वजण आनंदी, निरोगी आणि उत्साही आहात अशी आशा बाळगते आणि ४५ वर्षावरील आपल्यातील सर्वांनी लसही घेतली असेलच. कारण आपण सर्वांनी या परिस्थितीत जबाबदार नागरिक म्हणून कार्य करणे आणि सर्व शिष्टाचार काळजीपूर्वक पाळणे महत्वाचे आहे.

नर्सरी आणि इतर वर्गात नव्याने प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी सर्वप्रथम स्वागत करते आणि मला ही या एस.व्ही.एम कुटूंबाचा भाग होऊन एक वर्ष पूर्ण होत आहे त्यानिमित्ताने मी माझ्या प्रिय विद्यार्थ्यांचे आणि आपल्या सर्वांचे आभार मानते. उत्तम संस्था, आपल्यासारखे जागरूक आणि शिक्षणप्रेमी पालक आणि सर्वोत्तम शिक्षकांबरोबर काम करायला मिळाल्याने मी स्वतःला भाग्यवान समजते. या सरत्या वर्षात घेतले गेलेले सर्व उपक्रम व अध्ययन-अध्यापन हे विद्यार्थ्यांचे हीत लक्षात घेऊन राबवले गेले आणि येणाऱ्या शैक्षणिक वर्षाचा विचार करता भविष्यातही प्रत्येक विद्यार्थी केंद्रस्थानी ठेऊन नियोजन आणि अंमलबजावणी केली जाईल हे नक्की!

आज २० एप्रिल, आपल्या इंग्रजी बूट कॅम्पला एक महिना पूर्ण झाला. या महिन्याभरात विद्यार्थ्यांना नक्कीच काहीतरी उपयुक्त गवसले असेल. शिक्षकांसाठी विद्यार्थ्यांबरोबर या महिन्याभरात घालवलेला प्रत्येक क्षण खास होता त्यामुळे शिक्षकांइतकेच विद्यार्थ्यांनीही याचा आनंद घेतला असेलच.
या दरम्यान वेळोवेळी आपल्या कडून मिळालेल्या सूचना आणि अभिप्राय यामुळे नक्कीच आम्हाला अधिकाधिक चांगल्या प्रकारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे शक्य झाले. त्याबद्दल आपणास धन्यवाद!

आपण आव्हानात्मक असे एक वर्ष पूर्ण केले असून आपले नवीन शैक्षणिक वर्ष ७ जून, २०२१ पासून सुरु होईल. त्याअनुषंगाने मे महिन्यात अंदाजे २४ किंवा २५ तारखेच्या दरम्यान नवीन शैक्षणिक वर्षातील शाळेची वेळ आणि इतर गोष्टींची माहिती देण्यासाठी एका पेरेंट्स ओरिएंटेशन चे आयोजन केले जाईल.

विद्यार्थ्यांना आता उन्हाळी सुटी लागली असल्याने सुट्टीचा सदुपयोग, वर्षभराची उजळणी होण्यासाठी तसेच त्यांना काहीतरी नवीन माहिती मिळावी या उद्देशाने विद्यार्थ्यांसाठी सुट्टीचा अभ्यास (समर पॅक)

पाठवत आहोत. विद्यार्थ्यांनी तो एका स्वतंत्र वहीत सोडवून पूर्ण करावा. शाळा सुरु झाल्यावर ती वही विद्यार्थ्यांनी शाळेत जमा करायची आहे.

तसेच आपल्याला पुढील वर्षासाठी लागणाऱ्या वह्या पुस्तकांची आणि इतर शालेय साधनांची यादी पाठवीत आहोत. आपल्याला शक्य होईल त्यानुसार साधारण ३० मे पर्यंत बाजारातून खरेदी करून ठेवावी ही विनंती.

आपल्याकडून याप्रमाणेच भविष्यात नेहमीच उत्तम सहकार्य लाभेल याची खात्री बाळगून पुन्हा एकदा सर्वांना खूप खूप धन्यवाद !

- शाळेचे कार्यालय हे प्रवेश प्रक्रिया, फी भरणे  वा इतर चौकशीसाठी ऑनलाइन कार्यान्वित असेल.
- एसव्हीएम मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यासाठी प्रवेश फॉर्म ऑनलाइन उपलब्ध आहेत.
- स्थानिक प्रशासनाने परवानगी दिल्यावर शाळेचे कार्यालय प्रत्यक्ष कार्यान्वित होईल.
- अधिकृत व्हॉट्सअप नंबर किंवा ईमेलवर आपण आपल्या शंका आणि सूचना विचारू / पाठवू शकता.

धन्यवाद !

आपली विश्वासू,

मुख्याध्यापिका,
सर्वंकष विद्यामंदिर, रत्नागिरी.